पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारित

# मराठी व्याकरण, निबंधमाला व कल्पनाविस्तार

## इयत्ता ८ वी ते १० वी साठी

संभाजी पाटील

इ. ११ वी व १२वी च्या मुलांनाही उपयुक्त
एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त.
५० हून अधिक निबंध व कल्पनाविस्तारांचा एकत्रित संग्रह

| | | |
|---|---|---|
| ❊ वर्णमाला | ❊ शब्दसिद्धी | ❊ संधी |
| ❊ पदपरिस्फोट | ❊ शब्दांच्या जाती | ❊ प्रयोग |
| ❊ अलंकार, वृत्ते | ❊ विरामचिन्हे | ❊ समास |
| ❊ शुद्धलेखन | ❊ निबंधमाला | ❊ कल्पनाविस्तार |
| ❊ वाक्यांचे प्रकार व रूपांतर | ❊ लिंग, वचन, विभक्ती | |

परी प्रकाशन, कोल्हापूर

KD1

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मराठी व्याकरण, निबंधमाला व कल्पनाविस्तार (८ वी ते १० वी)**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१
pariprakashan@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
१५ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १५०/-

*ज्यांच्या पाठकुळीवर बसून रानोमाळ हिंडलो,*
*मायबोलीचे बाळकडू प्यालो*
*पंखांत बळ आणून गरुडझेप घेण्यापूर्वीच*
*ज्यांच्या छत्रावाचून पोरके झालो*
*ते माझे स्वर्गीय पिताश्री*
***कै. गोविंद दाजी पाटील** यांना*

*तसेच*

*आकाशात उंच भरारी मारण्यास*
*नेहमी उत्सुक असलेल्या,*
*ज्ञानासाठी तहानलेल्या*
***चि. शुभम्** व **चि. स्वाती** यांस.*

# मनोगत...

इंग्रजी भाषेच्या वाढत्या प्राबल्यामुळे मराठी भाषेच्या अभ्यासाकडे सर्वांचेच दुर्लक्ष होऊ लागले आहे; पण मराठी ही आपली मातृभाषा आहे. तिची अस्मिता सर्वांनीच जपली पाहिजे. यासाठीच मराठीचा शास्त्रशुद्ध अभ्यास महत्त्वाचा आहे.

आजकाल बहुतेक सर्वच मुलांना 'भाषा' या विषयात गुण कमी मिळतात. त्याचा बारकाईने अभ्यास केल्यास मुलांचे व्याकरणाकडे दुर्लक्ष होऊ लागल्याचे दिसून येते. भाषा विषयात चांगले गुण मिळण्यासाठी व्याकरणाचा सखोल अभ्यास करणे खूप गरजेचे आहे.

इयत्ता ८ वी ते १० वीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट व्याकरणाच्या घटकांचा नीट अभ्यास केल्यास त्यातील काही भाग पूर्वज्ञानावर आधारित असल्याचे आढळून येते. उदा. 'व्याकरण चालवणे' या भागावर प्रभुत्व मिळवण्यासाठी मुलांना शब्दाच्या जाती, त्याचे पोटप्रकार, लिंग, वचन, पुरुष, विभक्ती, प्रयोग इत्यादी घटकांचा अभ्यास आवश्यक आहे. म्हणूनच या पुस्तकाची रचना करताना पायाभूत ज्ञानाचा विचार केला आहे. शिवाय व्याकरणातील अनेक संबोधांचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामुळे मुलांना व्याकरण समजून घेणे सोपे जाईल.

आजचा विद्यार्थी हा केवळ पढतपूर्ण न होता तो ज्ञानसमृद्ध व्हायला हवा. त्याने मिळवलेल्या ज्ञानातून जीवन जगण्याचे कौशल्य आत्मसात करण्याचे बळ त्याच्यात यायला हवे. हे सर्व काही तेव्हा जमते जेव्हा त्याचे वाचन चौफेर असते. वाचनाने आपली भाषा आकर्षक, समृद्ध व प्रभावशाली बनते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या अंगी प्रथम वाचनाची गोडी लागायला हवी. ज्याचे वाचन चांगले, त्याचे लेखन चांगले हे नेहमी आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे.

आजकाल सर्वच विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन खूपच कमी झाले आहे. पाठ्यपुस्तकातील मर्यादित आशयाची घोकंपट्टी करायची आणि परीक्षा द्यायची हे आजच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे परीक्षेचे सूत्र झाले आहे. तरीही परीक्षेत मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांना सरासरी गुणांपेक्षा कमी गुण का पडतात? याचे मुख्य कारण म्हणजे वाचनसंस्कृतीचा अभाव. दहावीत शिकत असणाऱ्या आजच्या विद्यार्थ्याला आयत्या वेळी दिलेल्या विषयावर चार शब्द बोलता येत नाहीत किंवा लिहिता येत नाहीत ही खेदाची बाब आहे. याचेही कारण वाचनाच्या अभावाकडेच जाते.

सदर 'मराठी व्याकरण, निबंधमाला व कल्पनाविस्तार' या पुस्तकात मराठी व्याकरणातील वर्णमाला संधी, शब्दांच्या जाती, लिंग, वचन, विभक्ती, पदपरिस्फोट, समास, प्रयोग, अलंकार, वृत्ते, शब्दसिद्धी, विरामचिन्हे आणि शुद्धलेखनाच्या नियमांबरोबरच निबंधमाला आणि कल्पनाविस्तार यांचा समावेश करून पुस्तकाला बळकटी आणण्याचा नवा प्रयोग केला आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सर्जनशीलतेला पुरेशी चालना मिळेल असा प्रयत्न केला आहे. निबंध आणि कल्पनाविस्तार यांतील भाषा साधी, सोपी, आकर्षक आणि लयबद्ध ठेवली आहे. प्रसंगी काव्यात्मक दाखलेही दिले आहेत.

या पुस्तकात समावेश असलेला व्याकरणाचा भाग, निबंधमाला आणि कल्पनाविस्तार या गोष्टींची निर्मिती करताना विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी बनवणे हा उद्देश डोळ्यांसमोर न ठेवता त्यांना मातृभाषेबद्दल आवड निर्माण करणे, प्रमाण भाषेची जाणीव करून देणे, निबंध लिहिण्यास व वाचण्यास प्रवृत्त करणे यासाठीच हे पुस्तक लिहिण्याचा खटाटोप केला आहे.

सदर पुस्तक इयत्ता ८ वी ते १० वी च्या मुलांबरोबरच इयत्ता ११ वी व १२ वीच्या मुलांनाही उपयोगात येईल अशी रचना केली आहे. मराठीचे अभ्यासक, एम्.पी.एस.सी व इतर सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी यांना निश्चितच हे पुस्तक दिशादायी ठरेल अशी आशा आहे.

**– संभाजी पाटील**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरण व तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | **वर्णमाला :** वर्ण म्हणजे काय?, वर्णाचे प्रकार, जोडाक्षर, स्वरांचे प्रकार, व्यंजनांचे प्रकार, वर्णांची उच्चारस्थाने, नवीन भाषा विज्ञान परिचय. | ११ |
| २. | **संधी :** संधीचे प्रकार, स्वरसंधीचे नियम, व्यंजनसंधीचे नियम, विसर्गसंधीचे नियम. | २० |
| ३. | **शब्दांच्या जाती :** नाम व नामाचे पोट प्रकार, सर्वनाम व सर्वनामाचे पोट प्रकार, विशेषण व त्याचे पोटप्रकार, क्रियापद, कर्ता, कर्म, अर्थ, प्रकार, काळ, कियाविशेषण व त्याचे पोटप्रकार, शब्दयोगी व त्याचे पोटप्रकार, उभयान्वयी व त्याचे पोटप्रकार, केवलप्रयोगी व त्याचे पोटप्रकार | २९ |
| ४ | **लिंग :** लिंग व लिंगाचे प्रकार, उदाहरणे. | ७० |
| ५. | **वचन :** वचन व वचनाचे प्रकार, उदाहरणे. | ७४ |
| ६. | **विभक्ती व विभक्तीचे अर्थ :** विभक्ती विषयक संबोध, विभक्ती प्रत्यय, विभक्तीचे कारकार्थ व उपपदार्थ. | ७९ |
| ७. | **प्रयोग :** प्रयोग : अर्थ व प्रकार. | ८६ |
| ८. | **समास :** समासाचे प्रकार व पोट प्रकार | ९२ |

| | | |
|---|---|---|
| **९.** | **शब्दसिद्धी :**<br>शब्दसिद्धी : अर्थ, प्रकार, सिद्‌ध शब्द व त्याचे प्रकार, साधित शब्द व त्याचे प्रकार. | **१०३** |
| **१०.** | **पदपरिस्फोट :**<br>पदपरिस्फोट : अर्थ, व्याकरण चालविण्यासाठी आवश्यक माहिती, उदाहरणे. | **११४** |
| **११.** | **वाक्यांचे प्रकार व रुपांतर :**<br>वाक्यांचे प्रकार : विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्‌गारार्थी, होकारार्थी, नकारार्थी, स्वार्थी, आज्ञार्थी, विध्यर्थी, संकेतार्थी, केवल वाक्य, मिश्र वाक्य, संयुक्त वाक्य, वाक्यांचे रुपांतर. | **११८** |
| **१२.** | **अलंकार :**<br>शब्दालंकार : अनुप्रास, यमक, श्लेष, अर्थालंकार, उपमा, उत्प्रेक्षा, अनन्वय, रूपक, अतिशयोक्ती, स्वभावोक्ती, अन्योक्ती, दृष्टांत. | **१२६** |
| **१३.** | **वृत्ते :**<br>वृत्तांचे पकार, भुजंग प्रयात, वसंततिलका, शार्दुलविक्रीडित, मंदाक्रांता, आर्या, पादाकुलम. | **१३२** |
| **१४.** | **विरामचिन्हे :**<br>विरामचिन्हे : प्रकार व उदाहरणे. | **१३८** |
| **१५.** | **शुद्धलेखन :**<br>शुद्धलेखनाचे नियम, सामान्य रुपे, शुद्ध शब्दांची यादी. | **१४०** |
| **१६.** | **निबंधमाला :** | **१४७** |

| | | |
|---|---|---|
| १. | पर्यावरण संतुलन - काळाची गरज | १४९ |
| २. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | १५० |
| ३. | फळ्याचे आत्मवृत्त | १५२ |
| ४. | आमचे श्रमदान | १५४ |
| ५. | पडक्या किल्ल्याचे आत्मवृत्त | १५५ |
| ६. | समाजाभिमुख संत गाडगेबाबा | १५७ |
| ७. | जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती | १५९ |
| ८. | माझ्या स्वप्नातील गाव... | १६१ |
| ९. | शाळा - एक संस्कार सरिता | १६२ |
| १०. | एका महापूरग्रस्ताचे मनोगत... | १६४ |
| ११. | देव बोलू लागला तर... | १६५ |
| १२. | राष्ट्रपिता महात्मा गांधीजी | १६७ |
| १३. | मी संगणक बोलतोय... | १६९ |
| १४. | सूर्य उगवला नाही तर... | १७१ |
| १५. | दलित समाजसूर्य - डॉ. आंबेडकर | १७२ |
| १६. | मी चंद्रावर गेलो तर... | १७४ |
| १७. | मराठी पाऊल पडती पुढे | १७६ |
| १८. | युगपुरुष - छत्रपती शिवराय | १७८ |
| १९. | पाणी अडवा, पाणी जिरवा | १७९ |
| २०. | मी मुख्यमंत्री झालो तर... | १८१ |
| २१. | विद्यार्थी - आजचा आणि कालचा | १८२ |
| २२. | रक्षाबंधन | १८४ |
| २३. | आमचे वनभोजन | १८५ |
| २४. | हुंडा एक अनिष्ट प्रथा | १८७ |
| २५. | वाचाल तर वाचाल ! | १८८ |
| २६. | अंधश्रद्धा - एक शाप | १९० |
| २७. | माझा आवडता छंद : वाचन | १९१ |
| २८. | माझा आवडता सण : दिवाळी | १९३ |
| २९. | भग्न देवालयाचे आत्मवृत्त | १९५ |
| ३०. | विज्ञान - शाप की वरदान ! | १९६ |
| ३१. | मुलींचे घटते प्रमाण - एक समस्या | १९८ |
| ३२. | थोर समाजसुधारक - महात्मा फुले | २०० |
| ३३. | मी पाहिलेली जत्रा | २०२ |
| ३४. | ग्रंथ हेच गुरू | २०३ |

१७. कल्पनाविस्तार २०५

१. जे खळांची व्यंकटी सांडो। २०६

२. लोका सांगे ब्रह्मज्ञान,
आपण मात्र कोरडे पाषाण । २०६

३. कष्टेविण फळ नाही ।
किंवा
यत्न तो देव जाणावा । २०८

४. सुसंगती सदा बडो । सुजन वाक्य कानी पडो । २०९

५. क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे । २०९

६. साक्षर जनता, भूषण भारता । २१०

७. जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जे आपुले...। २११

८. सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जे करील तयाचे। २१२

९. जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण । २१३

१०. तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी । २१३

११. वाचाल तर वाचाल । २१४

१२. वाचवील पाणी, साठवील पाणी ।
त्यालाच फक्त जगवील पाणी । २१५

१३. वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे । २१६

१४. थांबला तो संपला, काळ पुढे चालला । २१६

१५. आलसस्य कुतो विद्या, अविद्यस्य कुतो धनम् । २१७

१६. गरज सरो, वैद्य मरो । २१८

१७. खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे । २१९

१८. महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती । २२०

१९. थेंबे थेंबे तळे साचे । २२०

२०. जनसेवा हीच ईश्वर सेवा २२१

२१. जो दुसऱ्यावर विश्वासला,
त्याचा कार्यभाग बुडाला । २२२

२२. मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।। २२३




१

# वर्णमाला

भाषा हे आपले विचार व्यक्त करण्याचे साधन आहे. भाषेशिवाय व्यक्ती-व्यक्तीत देवाण-घेवाण होण्यास अडथळे निर्माण झाले असते. भाषेचा विकास हळूहळू टप्प्या-टप्प्याने झाला. निरनिराळ्या आवाजांच्या सांकेतिक खुणा म्हणजे 'लिपी' होय व त्यातील प्रत्येक खुणेला **'अक्षर'** म्हणतात. ठरावीक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहाला काही अर्थ प्राप्त झाला, तर त्याला **'शब्द'** म्हणतात. आणि अर्थपूर्ण शब्दसमूहाला **'वाक्य'** म्हणतात.

**वर्ण म्हणजे काय?**

आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण **'वर्ण'** असे म्हणतो.

मराठी भाषेत असे ४८ वर्ण मानतात. ४८ वर्णांच्या या मालिकेला **'वर्णमाला'** किंवा **'मुळाक्षरे'** असे म्हणतात.

मराठी भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे आहे.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः

क्, ख्, ग्, घ्, ङ्

च्, छ्, ज्, झ्, ञ्